RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-अ

वर्ष ९, अंक २४(२)] सोमवार, फेब्रुवारी २७, २०२३/फाल्गुन ८, शके १९४४ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक ५४

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

विधि व न्याय विभाग

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ फेब्रुवारी २०२३.

अधिसूचना

महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम.

क्रमांक : सीआरसी २०१९/प्र.क्र.१६३(३)/का.बारा.— महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम, (१८६९ चा १४) याचे कलम २१, २२ अ व २३ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून; आणि याबाबतीत यापूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचनांचा जेथवर त्या जिल्हा न्यायालय लातूर यांना दुय्यम असणाऱ्या दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर लातूर यांच्याशी जेथवर संबंध असेल तेथवर, त्यांमध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे पुढीलप्रमाणे निदेश देत आहे की, दिनांक ४ मार्च, २०२३ पासून,—

(क) लातूर जिल्ह्यामध्ये औसा येथे जिल्हा न्यायालय, लातूर यास दुय्यम असलेले एक दिवाणी न्यायालय असेल;

(ख) दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) हे, उक्त न्यायालयाच्या अध्यक्षस्थानी असतील आणि ते औसा येथे आपले न्यायालय भरवतील;

(ग) दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) औसा यांच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये लातूर जिल्ह्यातील औसा महसुली तहसीलांचा समावेश असेल आणि यापूर्वी, दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) लातूर यांच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये ज्यांचा समावेश करण्यात आला होता अशी क्षेत्र उक्त तहसीलामधून वगळण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

नि. वि. जिवने,
शासनाचे विधि सल्लागार-नि-सह सचिव.

LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 27th February 2023.

NOTIFICATION

MAHARASHTRA CIVIL COURTS ACT.

No. CRC 2019/CR 163(I)/Desk XII.— In exercise of the powers conferred by sections 21, 22 A and 23 of the Maharashtra Civil Courts Act (XIV of 1869) and of all other powers enabling it in this behalf, and in partial modification of all earlier notifications issued in this behalf; in so far as they relate to the Court of Civil Judge, Senior Division, Latur in Latur, sub-ordinate to the District Court, Latur, the Government of Maharashtra hereby, directs that with effect from 4th March, 2023,—

(a) there shall be a Civil Court at Ausa, sub-ordinate to the District Court, Latur in Latur District;

(b) the said Court shall be presided over by the Civil Judge, Senior Division, who shall hold his Court at Ausa; and

(c) the local limits of the ordinary jurisdiction of the Civil Judge, Senior Division, Ausa, shall comprise area covered within the local limits of the Court of Civil Judge, Junior Division, Ausa and the work from the said area which was heretofore included within the local limits of the ordinary and special jurisdiction of Civil Judge, Senior Division at Latur shall be excluded therefrom.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

N. V. JIWANE,
Legal Advisor-*cum*-Joint Secretary to Government.